# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०९/०६/२०२५

## नागपुर ग्रामीण जिल्हयांचे पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष ए. पोद्दार यांची Mid-Career Training Program (MCTP) मध्ये सर्वोत्तम पहिल्या पाच अधिकाऱ्यांमध्ये निवड, त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी High Achievement Certificate जाहीर

भारतीय पोलीस सेवेतील पोलीस अधीक्षक ते पोलीस उपमहानिरीक्षक श्रेणीच्या अधिकाऱ्यांना तंत्रज्ञान आणि प्रशासनाच्या बाबतीत नाविन्यपुर्ण विकासाबाबत प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय पोलीस ॲकॅडमी , हैद्राबाद मध्ये Mid-Career Training Program (MCTP) आयोजीत केले जाते. दिनांक २१/०४/२०२५ ते १७/०५/२०२५ पर्यंत राष्ट्रीय पोलीस ॲकॅडमी ,हैद्राबाद येथे आयोजीत Mid-Career Training Program (MCTP) मध्ये संपुर्ण भारतातुन ८२ पोलीस अधीक्षक ते पोलीस उपमहानिरीक्षक श्रेणीच्या अधिकाऱ्यांनी भाग घेतला होता. महाराष्ट्रातील इतर पोलीस अधिकारी यांच्यासह मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांना राज्य शासनाने सदर प्रशिक्षणाला पाठविले होते. **राष्ट्रीय पोलीस ॲकॅडमी ,हैद्राबाद यांनी आज दिनांक ०९/०६/२०२५ रोजी Mid-Career Training Program (MCTP) चा अंतिम निकाल जाहीर केला असुन त्यात मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांची सर्वोत्तम पहिल्या पाच अधिकाऱ्यांमध्ये**

**निवड करण्यात आली तसेच त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्यांना High Achievement Certificate जाहीर करण्यात आले आहे.**

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांचे त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी शुभेच्छा देवुन अभिनंदन केले आहे.